**CNR No. MHSO070001582020**

**नियमित दिवाणी दावा नं. १३१/२०२०**

शिवम आनंद यलमार वगैरे वि.

आनंद मुरलीधर यलमार

**निशाणी १७ वर आदेश नियमित दिवाणी दावा नं. १३१/२०२०**

(आदेश पारित दिनांक ०४/०५/२०२२)

प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादीविरूध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादीने सदरील अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ प्रमाणे वादीच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरिता केलेला आहे. वादीच्या कथनांप्रमाणे सदरच्या दाव्यात वादी यांनी ७/१२ उतारे, ६ड फेरफार उतारे व खरेदीखताचे नकला दाखल केलेले आहेत. परंतु नजरचुकीने अनावधानाने दस्ताप्रमाणे दाव्यामध्ये नमूद करणेचे राहिलेल आहे. त्यामुळे वादींनी दाव्याच्या पान क्र. ३ वर दावा कलम ३ चे नंतर खालीलप्रमाणे दुरूस्ती करून मागितलेली आहे. तो मजकुर खालीलप्रमाणेः

"३ (अ) यातील वादी क्र. १ चे वडील व वादी क्र. २ चे पती म्हणजेच प्रतिवादी यांची दावा कलम १ (ब) गट क्र. १७२ एकूण क्षेत्र ०२ हे. ९४ आर. पो.ख. ०० हे०. ०२आर. ही मिळकत वडिलार्जित असल्याने त्यापैकी ०१ हे. ९५ आर. क्षेत्राची सन २०१७ ला विक्री करून त्यामधील आलेल्या उत्पन्नातून (पैशातून) दावा कलम १ (अ) गट क्र. ४८ क्षेत्र ०२ हे. ४०आर. खरेदी घेतलेली असल्याने दावा मिळक्ती हया वादी व प्रतिवादी यांचे एकत्रातील आहेत" असे लिहीणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादींनी केलेली आहे.

०२. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादींनी हजर होवून आपले म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

०३.     अभिलेख, अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी हे समन्स मिळून देखील प्रस्तुत दाव्यात हजर झालेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द एकतर्फा चालविण्यात आला. तसेच, वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होताना दिसत नाही. त्यामुळे दुरूस्तीचे कारण देखील संयुक्तिक दिसून येते. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा निकाल गुण दोषावर लागण्याकरिता आवश्यक आहे. सबब, सदर अर्ज मंजुर करणेस कोणतीही हरकत दिसून येत नाही.

०४.     त्यामुळे वादी यांना प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. वादी यांनी कायदेशीर कालमर्यादेमध्ये प्रस्तावित दुरुस्ती करावी.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र. ११ चा अर्ज मंजुर करणेत येतो.

२. वादीस निर्देशित करण्यात येते की, वादीने अर्जाप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. प्रस्तुतची दुरूस्ती वादीने या आदेशाच्या १४ दिवसांच्या आतमध्ये करणेची आहे.

४. सदरचा खर्च वादीने सोसणेचा आहे.

RANJANA GOVIND KUMBHAR
Digitally signed by RANJANA GOVIND KUMBHAR
Date: 2022.05.09 17:01:10 +0530

दिनांक– ०४/०५/२०२२                श्रीमती आर. जी. कुंभार

ठिकाण– पंढरपूर                ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

पंढरपूर

**CNR No. MHSO070001582020**

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M.P.Gheradi ( L. G.) |
| Court | :- | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 04.05.2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 06.05.2022 |
| Judgment/Order uploaded on | :- | 09.05.2022 |